# बी.ए.भाग २ सत्र ३, अभ्यासपात्रिका क्रमांक ३
# ‘देवबाभळी’ : - प्राजक्त देशमुख व अभिवाचन
## प्रश्न संच/Question Bank
## सन २०२३-२०२४ पासून लागू

योग्य पर्याय निवडा

१.प्राजक्त देशमुख यांच्या घरी कोणत्या संप्रदायाची समृद्ध परंपरा होती.
अ)नाथ ब) दत्त क) नागेश ड) वारकरी

२. नाटक ही कोणत्या प्रकारची कला आहे
अ) दृक ब) श्राव्य क) प्रयोगरूप ड) आभासी

३. ‘देवबाभळी’ या नाटकात आवलाई लखुबाईशी करत असलेल्या चर्चेतून कोणते पात्र उभे करते.
अ) सावजी ब) विश्वंभर बुवा क) तुकाराम ड) कनकाई

४. आवलाई भांडा-याच्या डोंगरावर तुकारामासाठी कोणता पदार्थ घेऊन गेली होती.
अ) भाकरी ब) लापसी क) खीर ड) मांडे

५. ‘देवबाभळी’ या नाटकात पात्रांची भावस्थिती उलगडण्यासाठी कशाचा वापर केला आहे.
अ) गीते ब) मोजक्या घटना क) कमी प्रसंग ड) कमी पत्रे

६. ‘देवबाभळी’ हे नाटक कोणत्या दोन स्त्रियांचे दु:ख मांडते आहे.
अ) आवलाई व लखुबाई ब) जिजा व आवली क) रुक्मिणी व लखुबाई ड) विठाबाई व आवलाई

७. आवलाईच्या पायात कोणता काटा घुसतो.
अ) बोरीचा ब) देवबाभळीचा क) सोंदड ड) मखमल

८. आवलाई आपली जखम बांधण्यासाठी कुणाचा शेला घेते.
अ) रुक्मिणीचा ब) तुकारामचा क) सावजीचा ड) विठ्ठलाचा

९. आवलाईच्या थोरल्या दिराचे नाव काय आहे.
अ) सावजी ब) रावजी क) खंडू ड) पांडू

१०. विठ्ठलाचे नामस्मरण करायला तुकोबा कोणत्या डोंगरावर बसत होते.
अ) भवानी ब) भंडारा क) वाघजाई ड) आळंदी

११. कर्जाच्या वह्या तुकोबांनी कोणत्या नदीच्या पात्रात बुडवल्या.
अ) इंद्रायणी ब) मुळा क) मुठा ड) गिरणा

१२. विठ्ठलावर रुसून रुक्मिणी कुठे जाते.
अ) माहेरी ब) दिंडार वनात क) मावशीकडे ड) आवलीकडे

१३. लखुबाई आवलीचे घर कधी सोडून जाते.
अ) जखम भरल्यावर ब) जेवण झाल्यावर क) पाऊस पडल्यावर ड) तुकोबांनी जा म्हटल्यावर

१४. विठ्ठलासाठी आवलाई खालील पैकी कोणते विशेषण वापरत नाही.
अ) इठ्या ब) काळतोंड्या क) पांड्या ड) सोंड्या

१५. लखुबाईच्या डोक्यात चिडलेली आवलाई तिच्या डोक्यात कोणती वस्तू घालणार असते.
अ) वीट ब) पाण्याचा तांब्या क) हंडा ड) दगड

१६. प्राजक्त देशमुख यांचा जन्म कोणत्या साली झाला.
अ) ७ जून १९८४ ब) ७ जून १९८५ क) ७ जून १९८६ ड) ७ जून १९८७

१७. ‘देवबाभळी’ या नाटकाचा पहिला प्रयोग कधी झाला.

अ) २२ डिसेंबर २०१५ ब) २२ डिसेंबर २०१६ क) २२ डिसेंबर २०१७ ड) २२ डिसेंबर २०१८

१८. 'देवबाभळी' या नाटकातील विषय कोणत्या संप्रदायाशी निगडीत आहे .

अ) वारकरी संप्रदाय ब) दत्त संप्रदाय क) नागेश संप्रदाय ड) महानुभाव संप्रदाय

दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'देवबाभळी' या नाटकाचे कथानक तुमच्या भाषेत लिहा.
२. 'देवबाभळी' या नाटकाची आशयसूत्रे स्पष्ट करा.
३. 'देवबाभळी' या नाटकातील संघर्षाचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.
४. 'देवबाभळी' या नाटकातील घटना, प्रसंग आणि वेगळेपण विशद करा.
५. 'देवबाभळी' या नाटकाच्या आधारे आवलाई व लखुबाई ही पत्रे स्पष्ट करा.
६. "दोन संसारी स्त्रियांचा मनोमन संवाद म्हणजे 'देवबाभळी' नाटक" होय हे विधान स्पष्ट करा.
७. आवलाई व लखुबाई यांचे भावविश्व रेखाटा.
८. 'देवबाभळी' या नाटकातील संवाद आणि वातावरण निर्मिती कशी मांडली आहे ते लिहा .
९. 'देवबाभळी' या नाटकातील पात्रांचे सविस्तर वर्णन करा.
१०. 'नाटक' म्हणजे काय ते सांगून नाटकाचे संकल्पना व स्वरूप लिहा.
११. 'देवबाभळी' या नाटकाची आशयसूत्रे तुमच्या भाषेत लिहा.

लघुत्तरी प्रश्न

१. आपण अभ्यासलेल्या 'देवबाभळी' या नाटकाच्या आधारे नाटकाच्या भाषेचे वेगळेपण लिहा.
२. आवलाई आणि लखुबाई यांच्या भाषेचे परस्पर वेगळेपण स्पष्ट करा.
३. 'देवबाभळी' या नाटकातील गीतांचे स्वरूप स्पष्ट करा.
४. 'देवबाभळी' या नाटकाचे नाट्य विशेष स्पष्ट करा.
५. 'देवबाभळी' या नाटकातील संघर्ष स्पष्ट करा.
६. 'देवबाभळी' या नाटकातील संवाद स्पष्ट करा.
७. 'देवबाभळी' या नाटकातील घटना प्रसंग स्पष्ट करा.
८. 'देवबाभळी' या नाटकातील पत्रे स्पष्ट करा.
९. 'नाटक' या साहित्य प्रकारचे घटक स्पष्ट करा.
१०.'नाटक' या साहित्य प्रकाराची संकल्पना स्पष्ट करून त्याची वैशिष्टे लिहा.

लघुत्तरी प्रश्न घटक ४

१. आकाशवाणी वरील अभिवाचनाचे स्वरूप स्पष्ट करा.
२. दूरचित्रवाणी आणि सभागृहातील अभिवाचनाचे स्वरूप स्पष्ट करा.
३. अभिवाचनाच म्हणजे काय ते सांगून अभिवाचनासाठी कोणती पूर्व तयारी करावी लागते,ते लिहा.
४. अभिवाचनाची तत्त्वे सोदाहरण स्पष्ट करा.
५. अभिवाचनासाठी कोणते गुण असावे लागतात, ते लिहा .
६. अभिवाचनासाठी लागणा-या पूरक साहित्याविषयी माहिती लिहा.
७. अभिवाचनाचा उद्देश स्पष्ट करा.
८. अभिवाचनासाठी असणारी पूरक साधने लिहा.
९. अभिवाचनासाठी उपयुक्त व्याय्याम कोणता ते लिहा.